MHRG190010372023

:: **<u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.६६/२०२० मधील निशाणी क्र.७ वरील आदेश</u>** ::

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश १, नियम १० अन्वये त्यांना प्रस्तुत भुसंपादन निर्देशन अर्जामध्ये समाविष्ट करुन घेण्याबाबत विनंती केली आहे.

०२. अर्ज व अर्जाला मुळ अर्जदारने दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही पक्षाच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०३. अर्जदाराचे कथन की, प्रस्तुतचा अर्ज हरकतदार क्र.१ अरुण कृष्णा सुतार, निराबाई कृष्णा उर्फ बारकु माटवणकर आणि सुमन मधुकर अदिस्तेकर उर्फ पंदेरकर यांना प्रतिवादी पक्षकार म्हणुन सामील करुन घेण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुतचा भुसंपादन निर्देश अर्जाची माहिती सामनेवाला क्र.१ यांचेकडे दाखल केला आणि त्याचा निवाडा दिनांक ३१.१२.२०१९ रोजी झाल्यानंतर मुळ अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेबाबत हालचाली केल्याचे समजले म्हणुन हरकतदार यांनी दिनांक २६.०६.२०२० रोजी मा.उपविभागीय अधिकारी सो॥. महाड यांचेकडुन भु संपादन अधिनियम २८(अ) अन्वये केलेल्या अंतिम निवाडयाची प्रत प्राप्त केली. प्रस्तुत अर्जाच्या सुनावणीबाबत माहिती प्राप्त केली असता अर्जदारानी खोटे वारस व मालकांच्या आधारे तसेच खरी माहिती कोर्टापासुन लपवुन रक्कम लुबाडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत

हरकतदार अर्जातील मिळकतीचे वारस व सहहिस्सेदार आहेत. या बाबतचे सर्व पुरावे हरकतदार यांस संधी मिळाल्यास त्यांचा असणारा वारस, सहहिस्सा शाबीत करण्यास तयार आहेत. सबब त्यांना आवश्यक पक्षकार म्हणुन समाविष्ट करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ ते ४ हे विषय मिळकतीचे पुर्वीचे सहमालक डी.के.शंकर वाळणकर उर्फ पार्वती शंकर तांबुटकर यांचे वारस असल्याचे भासवुन प्रस्तुत प्रकरणाव्दारे निकाल करुन घेण्याचे प्रयत्नात आहेत. अशा निकालाचा परिणाम हरकतदार यांचे वारस, सहहक्कावर होणार आहे म्हणुन त्यांना बाजु मांडण्यासाठी व म्हणणे व कैफियत दाखल करण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. हरकतदार यांचा विषय मिळकतीमध्ये हक्क हितसंबंध आहे त्यामुळे त्यांना प्रतिवादी पक्षकार म्हणुन समाविष्ट करण्याची विनंती केली आहे.

०५. प्रस्तुत अर्जास विरोध करताना मुळ अर्जदाराचे कथन की, प्रस्तुत अर्ज हा कायदयाने चुकीचा आहे. अर्जदार हे विशेष भुसंपादन अधिकारी यांचेसमोर हजर झाले नसल्यामुळे त्यांना प्रस्तुत प्रकरणात पक्षकार म्हणुन समाविष्ट करता येणार नाही. अर्जदारांनी त्यांचे हक्क सिध्द करण्यासाठी दिवाणी न्यायालयात जाऊन आपले हक्क सिध्द करावेत व त्यानंतर प्रस्तुतच्या भुसंपादन निर्देशन अर्जात पक्षकार म्हणुन समाविष्ट व्हावे. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०६. अर्ज उभयपक्षाच्या परस्पर विरोधी युक्तिवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुतचा मुळ अर्ज संपादित जमीनीच्या मागणीची वाढीव

बाजारभावाची रक्कम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. मुळ अर्जदार यांनी सदर अर्जास आक्षेप नोंदविला आहे. सदर प्रकरणाची पडताळणी केली असता असे दिसुन येते की, प्रस्तावीत अर्जदार हे संपादन प्रक्रियेमध्ये समाविष्ठ नव्हते. प्रस्तावित अर्जदारांना सदर मिळकतीमध्ये हक्क आहे किंवा नाही ही बाब या प्रकरणामध्ये विचारात घेता येणार नाही. प्रस्तावित अर्जदारांनी सदर अनुतोष दिवाणी न्यायालयातुन मिळविणे आवश्यक आहे. एकुणच मुळ अर्जदार यांनी उपस्थित केलेली हरकत तथा आक्षेप लक्षात घेता प्रस्तुत अर्जातील अर्जदार यांचे कथन उचित व न्यायसंगत नाही. याकामी मुळ अर्जदार यांच्या विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरण्यात येतो. सदर निष्कर्षास अनुसरुन खालील आदेश पारित.

:: **आदेश** ::

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2025.09.20 17:28:31 +0530

महाड **(श्रीमती एच.आर. जाधव)**

दिनांक २०.०९.२०२५ दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड